# अर्जाचा नमुना

## करार पद्धतीने नियुक्तीसाठी अर्ज

(शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र. १००/१३, दि. १७.१२.२०१६)

| |
|---|
| अलीकडील काळातील स्वतःचे छायाचित्र येथे चिकटवावे. |

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव:

२) अर्जदाचा पत्ता :

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :

४) भ्रमणध्वनी क्रमांक :

५) जन्म दिंनाक व वय :

६) नियुक्तीसाठी आवश्यक असलेली अर्हता आहे काय?

७) विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे?

८) अनुभवः-

| **अ.क्र.** | **काम केलेल्या विभागाचे/कार्यालयाचे नावे** | **कालावधी** | **कामाचे स्वरुप/विषय** |
|---|---|---|---|
| | | | |

सहायक लेखा अधिकारी या पदावर करार पद्धतीने नियुक्तीबाबतची जाहिरात / अटी व शर्ती मी काळजीपूर्वक वाचल्या असून करार पद्धतीने नियुक्तीबाबतच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, वरील सर्व माहिती सत्य असून सदर माहिती चुकीची आढळून आल्यास होणाऱ्या कारवाईस मी जबाबदार राहीन, याची मला जाणीव आहे.

स्वाक्षरी

(अर्जदाराचे नाव)

**सेवानिवृत्त सहायक लेखा अधिकारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करणेबाबतच्या अटी व शर्ती.**

(१) अर्जदार सहायक लेखा अधिकारी या पदावरून सेवानिवृत्त झालेला असावा.

(२) खर्चाचा ताळमेळ, लेखा विषय कामकाज हाताळणे, सेवा निवृत्तीवेतन विषयक प्रकरणे, सेवा पुस्तके अद्ययावत करणे इत्यादी कामकाजाचा अनुभव व संगणक हाताळण्याचे पुरेशे ज्ञान असणे आवश्यक आहे.

(३) अर्जदारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

(४) अर्जदाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

(५) आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सोबतच्या विहित नमुन्यात अर्ज करावा.

(६) अर्जदार शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच तो निर्व्यसनी असावा.

(७) अर्जदाराविरुद्ध कोततीही विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसावी अथवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

(८) अर्जदारांनी विहित दिनांकाच्या आत अर्ज सादर करावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार व कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच नियुक्तीची प्रक्रिया कोणत्याही टप्प्यात रद्द करण्याचे अधिकार विभाग प्रमुख यांना राहतील.

(९) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभाचा राहील. मुलाखतीचा दिनांक अर्जदारांना कळविण्यात येईल.

(१०) करार पद्धतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

(११) सदर नियुक्ती प्रथम एक वर्षाच्या कालावधीकरिता करण्यात येणार आहे. कामाची आवश्यकता असल्यास व कामकाज समाधानकारक असल्यास मुदतवाढ देण्याबाबतचा अधिकार विभागप्रमुखांना राहील.

(१२) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आल्यामुळे शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

(१३) करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीत नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी राहील.

(१४) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार, कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून मासिक पारिश्रमिक व भत्ते

(१५) नियुक्ती प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी, आगाऊ सूचना न देता करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. त्यासाठी कारणे देण्याचे नियुक्ती प्राधिकाऱ्यावर बंधनकारक राहणार नाही.

(१६) करार पध्दतीने नियुक्तीच्या कालाधीत सोपवलेली कामे पार पाडण्यात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतता येणार नाही.

(१७) करार पध्दतीच्या कालावधीत आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

(१८) सोपविलेले कामकाजाचा वेळोवळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करण्यात येईल.

(१९) करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीत कामकाजादरम्यान प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

(२०) उपरोक्त अटी व शर्तीसोबतच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.